# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

**(सामान्य प्रशासन विभाग)**

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉईंट मार्ग, नागपूर – ४४० ०३३

दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२९५६३०२ ई–मेल: arga@nagpuruniversity.nic.in


## अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०२३/५५ दिनांक: १२ मे २०२३

### व्यवस्थापन परिषदेसाठी अधिसभेच्या सदस्यांमधून निवडणूक

या अधिसूचनेनुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अधिसभेच्या सर्व सदस्यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४)(च), ३०(४)(छ), ३०(४)(ज) व ३०(४)(झ), उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दिनांक २८ एप्रिल २०१७ ची प्राधिकरणाचा सदस्य म्हणून उमेदवारीसाठी पात्रता व शर्ती विहीत करणारी अधिसूचना, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १ व विद्यापीठ निदेश क्रमांक १९/२०२३ नुसार अधिसभेच्या सदस्यांमधून विविध गटांसाठी विद्यापीठ **व्यवस्थापन परिषदेवर** सदस्य निवडून देण्याकरिता मा. कुलगुरूंचे मान्यतेने निवडणूक वेळापत्रक खालील प्रमाणे घोषित करण्यात येत आहे.

### निवडणूक वेळापत्रक भाग – १

| अ.क्र | विवरण | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेच्या सदस्यांमधून विद्यापीठ निदेश क्रमांक १९/२०२३ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४)(च)(30(4)(f) नुसार दोन प्राचार्य, कलम ३०(४)(छ) (30(4)(g) नुसार दोन अध्यापक/विद्यापीठ अध्यापक, कलम ३०(४)(ज) (30(4)(h) नुसार दोन व्यवस्थापन प्रतिनिधी व कलम ३०(४)(झ) (30(4)(i) नुसार दोन नोंदणीकृत पदवीधर निवडून देण्याकरिता अधिसभेच्या सदस्यांच्या निर्वाचक गणाची मतदार यादी प्रसिध्द करणाचा दिनांक. | दि. १२ मे २०२३ |

### निवडणूक कार्यक्रम भाग – २ (निवडणूक सूचना)

| अ.क्र | विवरण | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | विद्यापीठ अधिसभेच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर खालील नमूद गटातील सदस्य निवडून देण्याकरिता विद्यापीठ **निदेश क्रमांक** ७–ए/२०२३ नुसार नामनिर्देशन शुल्क रू. ५०/– रकमेचा **"वित्त व लेखा अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर"** ह्यांचे नावे निर्गमित केलेला राष्ट्रीयिकृत बॅंकेचा धनाकर्ष (DD) किंवा | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विवरण</th><th>अंतिम दिनांक व वेळ</th></tr>
<tr><td></td><td>
विद्यापीठाच्या रोख पटलावर रू.५०/— (रूपये पन्नास फक्त) रोख जमा करून घेतलेली पावती जोडून नामनिर्देशन पत्र (Nomination Paper) कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी—पॉईट मार्ग, नागपूर — ४४००३३ यांचकडे उमेदवारीकरिता सादर करणे.<br><br>
(अ) <u>प्राचार्य (Principal):</u><br>
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४)(च) (Section 30(4)(f) व विद्यापीठ निदेश क्रमांक १९/२०२३ नुसार, अधिसभेचे सदस्य असतील अशा प्राचार्यांमधून दोन प्राचार्य व्यवस्थापन परिषदेवर पुढीलप्रमाणे निवडून द्यावयाचे आहेत. त्यापैकी एक जागा अधिसभेवर निवडून आलेल्या इतर मागासवर्ग प्रवर्ग ह्या राखीव प्रवर्गातील प्राचार्यांसाठी राहील.<br>
<table>
<tr><th>खुला प्रवर्ग</th><th>इतर मागासवर्ग प्रवर्ग</th><th>एकुण</th></tr>
<tr><td>१</td><td>१</td><td>२</td></tr>
</table>
प्राचार्य गटातील उमेदवारीसाठी अधिसभा सदस्यांच्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत नाव असलेल्या व उमेदवार होऊ इच्छिणाऱ्या आणि उमेदवारीसाठीची पात्रता धारण करणाऱ्या प्राचार्य सदस्यांनी उमेदवारीकरिता नामनिर्देशन पत्र (Nomination Paper) सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ.
</td><td>दि.२७ मे २०२३ सायंकाळी ५.०० पर्यंत</td></tr>
<tr><td></td><td>
(ब) <u>अध्यापक/विद्यापीठ अध्यापक (Teacher/University Teacher):</u><br>
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४)(छ) (Section 30(4)(g) व विद्यापीठ निदेश क्रमांक १९/२०२३ नुसार, अधिसभेचे सदस्य असतील अशा अध्यापक/ विद्यापीठ अध्यापकांमधून जे मान्यताप्राप्त संस्थेचे प्राचार्य किंवा संचालक नाहीत असे दोन अध्यापक/विद्यापीठ अध्यापक व्यवस्थापन परिषदेवर पुढीलप्रमाणे निवडून द्यावयाचे आहेत. त्यापैकी एक जागा अधिसभेवर निवडून आलेल्या अनुसूचित जाती ह्या राखीव प्रवर्गातील अध्यापक/विद्यापीठ अध्यापकासाठी राहील.<br>
<table>
<tr><th>खुला प्रवर्ग</th><th>अनुसूचित जाती प्रवर्ग</th><th>एकुण</th></tr>
<tr><td>१</td><td>१</td><td>२</td></tr>
</table>
अध्यापक/विद्यापीठ अध्यापक गटातील उमेदवारीसाठी अधिसभा सदस्यांच्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत नाव असलेल्या व उमेदवार होऊ इच्छिणाऱ्या आणि उमेदवारीसाठीची पात्रता धारण करणाऱ्या अध्यापक/विद्यापीठ अध्यापक सदस्यांनी उमेदवारीकरिता नामनिर्देशन पत्र (Nomination Paper) सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ.
</td><td>दि.२७ मे २०२३ सायंकाळी ५.०० पर्यंत</td></tr>
</table>

| अ.क्र | विवरण | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|
| | (क) <u>व्यवस्थापनाचे प्रतिनिधी (Representative of Management)</u><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४)(ज) (Section 30(4)(h) व विद्यापीठ निदेश क्रमांक १९/२०२३ नुसार, अधिसभेचे सदस्य असतील अशा व्यवस्थापन प्रतिनिधीमधून व्यवस्थापन प्रतिनिधींपैकी **दोन प्रतिनिधी** व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाचे असतात. दोन प्रतिनिधींपैकी एक प्रतिनिधी खुला प्रवर्ग आणि एक प्रतिनिधी अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग प्रवर्गामधून आळीपाळीने निवडून द्यावयाचा असतो. निदेश क्रमांक १९/२०२३ च्या कलम ७ मध्ये क्रमांक १ मध्ये दर्शविलेल्या रकान्यानुसार यावेळेस सदर पद आळीपाळीने **अनुसूचित जमाती** प्रवर्गाकरिता आरक्षित ठरले आहे. परंतु, दिनांक २० नोव्हेंबर २०२२ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेच्या निवडणूकीकरिता व्यवस्थापनाचे प्रतिनिधी या निर्वाचक गणातील अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी एकही नामनिर्देशनपत्र प्राप्त न झाल्यामुळे अधिसभेवरील सदर पद रिक्त राहील व उर्वरित एक पद **खुला प्रवर्गातील व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीसाठी राहील.** व्यवस्थापन प्रतिनिधी गटातील (खुला प्रवर्ग) उमेदवारीसाठी अधिसभा सदस्यांच्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत नाव असलेल्या व उमेदवार होऊ इच्छिणाऱ्या आणि उमेदवारीसाठीची पात्रता धारण करणाऱ्या व्यवस्थापन प्रतिनिधी सदस्यांनी उमेदवारीकरिता **नामनिर्देशन पत्र** (Nomination Paper) सादर करण्याचा **अंतिम दिनांक व वेळ.** | **दि.२७ मे २०२३ सायंकाळी ५.०० पर्यंत** |
| | (ड) <u>नोंदणीकृत पदवीधर (Registered Graduates)</u><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४)(झ) (Section 30(4)(i)) व विद्यापीठ निदेश क्रमांक १९/२०२३ नुसार, अधिसभेच्या निवडून दिलेल्या नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून **दोन नोंदणीकृत पदवीधर** व्यवस्थापन परिषदेवर पुढीलप्रमाणे निवडून द्यावयाचे आहेत. त्यापैकी एक जागा अधिसभेवर निवडून आलेल्या **निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती प्रवर्ग** ह्या राखीव प्रवर्गातील नोंदणीकृत पदवीधरांसाठी राहील<br><table><tr><th>खुला प्रवर्ग</th><th>निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती प्रवर्ग</th><th>एकुण</th></tr><tr><td>१</td><td>१</td><td>२</td></tr></table>नोंदणीकृत पदवीधर गटातील उमेदवारीसाठी अधिसभा सदस्यांच्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत नाव असलेल्या व उमेदवार होऊ इच्छिणाऱ्या आणि उमेदवारीसाठीची पात्रता धारण करणाऱ्या नोंदणीकृत पदवीधर सदस्यांनी उमेदवारीकरिता **नामनिर्देशन पत्र** (Nomination Paper) सादर करण्याचा **अंतिम दिनांक व वेळ.** | **दि.२७ मे २०२३ सायंकाळी ५.०० पर्यंत** |

| अ.क्र | विवरण | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|
| २. | वर नमूद उमेदवारीसाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्राची **छाननी (Scrutiny)** करण्याचा **दिनांक व वेळ.** | **दि. २८ मे २०२३ सकाळी ११.०० पासून** स्थळ: विद्यापीठाचे जमनालाल बजाज प्रशासकीय भवन |
| ३. | वर नमूद वैध नामनिर्देशित उमेदवारांची **तातपुरती यादी** प्रसिध्द करण्याचा **दिनांक.** | **दि. २८ मे २०२३** |
| ४. | वर नमूद वैध नामनिर्देशित उमेदवारांच्या तातपुरत्या यादीवर मा. कुलगुरूंकडे **अपील सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ.** | **दि. ३० मे २०२३ सायंकाळी ५.०० पर्यंत** |
| ५. | वर नमूद वैध नामनिर्देशित **उमेदवारांची अंतिम यादी** प्रसिध्द करण्याचा **दिनांक व वेळ.** | **दि. १ जून २०२३ सायंकाळी ५.०० पर्यंत** |
| ६. | वर नमूद वैध नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या उमेदवाराला **निवडणूकीतून माघार (Withdrawal)** घ्यावयाची असल्यास, त्यासाठी लेखी सूचना सादर करण्याचा **दिनांक व वेळ** | **दि. ३ जून २०२३ सायंकाळी ५.०० पर्यंत** |
| ७. | वर नमूद निवडणूकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा **दिनांक.** | **दि. ४ जून २०२३** |
| ८. | वर नमूद निवडणूकीसाठी सभेच्या सभागृहातील **निवडणूकीचा दिनांक व वेळ.** (आवश्यक असल्यास). | **दि. ७ जून, २०२३ दुपारी १२.०० ते १.००** |
| ९. | वर नमूद **निवडणूकीची मतमोजणी** करण्याचा व निवडणूकीचे निकाल घोषित करण्याचा **दिनांक व वेळ.** | **दि. ७ जून, २०२३ मतदानानंतर लगेच** |

## महत्वाच्या सूचना:

१. उपरोक्त अधिसूचना, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १, उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दिनांक २८ एप्रिल, २०१७ ची प्राधिकरणाचा सदस्य म्हणून उमेदवारीसाठी पात्रता व शर्ती विहित करणारी अधिसूचना व विद्यापीठ निदेश क्रमांक १९/२०२३ व अधिसभा सदस्य मतदार यादी विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election – 2022** या पोर्टलवर व विद्यापीठाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

२. वर नमूद अधिसभा सदस्यांच्या मतदार यादीच्या मुद्रीत प्रती संबंधीताने अर्ज केल्यावर व विद्यापीठाने विहीत केलेले शुल्क प्रदान केल्यावर विद्यापीठ मुद्रण व प्रकाशन विभागातून उपलब्ध करून देण्यात येतील.

३. विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election – 2022** या पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेली मतदार यादी विनामूल्य डाऊनलोड करता येईल.

४. नामनिर्देशिन पत्र (Nomination Paper), नामनिर्देशन पत्रासोबत संलग्न कराव्या लागणाऱ्या माहितीचे प्रपत्र (Profile) व निवडणूकीत माघार घेण्यासाठी सादर करावयाचे सूचनापत्र (Notice of withdrawal) **कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी**, निवडणूक कक्ष, जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉईंट मार्ग, नागपूर – ४४० ०३३ यांचेकडून प्राप्त करून घ्यावेत किंवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील **Election–2022** या पोर्टलवरून डाऊनलोड करून त्याची प्रत विहीत माहितीसह सादर करावी.

५. आरक्षित जागेवरील उमेदवारीसाठी नामनिर्देशन पत्र सादर करतांना त्यासोबत सक्षम प्राधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४)(च), ३०(४)(छ), ३०(४)(ज) व ३०(४)(झ), उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दिनांक २८ एप्रिल २०१७ ची प्राधिकरणाचा सदस्य म्हणून उमेदवारीसाठी पात्रता व शर्ती विहीत करणारी अधिसूचना, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १ व विद्यापीठ निदेश क्रमांक १९/२०२३ नुसार, अधिसभेच्या सदस्यांमधून विविध गटांसाठी विद्यापीठ **व्यवस्थापन परिषदेवर** निवडून द्यावयाच्या सदस्यांपैकी जे अधिसभा सदस्य मागील निवडणूकीत अधिसभेवरून व्यवस्थापन परिषदेवर निवडून आले होते, ते संबंधित सदस्य आता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ६५ नुसार अधिसभेवरून **व्यवस्थापन परिषदेकरिता निवडणूक लढविण्यास पात्र ठरणार नाहीत.**

**मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये,**

(डॉ. राजू हिवसे)
**कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी**

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:**

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठ संचालित, संलग्नित आणि स्वायत्त महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक.
३. विद्यापीठाचे सर्व अधिकारी व शाखा प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
४. मानद संचालक, आय. टी. सेल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

यांना विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही घ्यावी.

**(प्रदीप बिनीवाले)**
**उपकुलसचिव (सा.प्र.) (अति. प्रभार) व**
**सहायक निवडणुक निर्णय अधिकारी**